आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दु ३.०० वाजता

९ जुलै २०२४ - मंगळवार

मुंबईतल्या रेल्वेमार्गांवरच्या विविध स्थानकांची नावं बदलण्याची शिफारस केंद्र सरकारकडे करण्याचा प्रस्ताव विधानपरिषदेनं आज एकमतानं मंजूर केला. मध्य रेल्वेमार्गावरच्या करी रोड स्थानकाचं नाव लालबाग स्थानक, मध्य आणि हार्बर रेल्वे मार्गांवरच्या सॅन्डहर्स्ट स्थानकाचं नाव डोंगरी स्थानक, पश्चिम रेल्वेमार्गावरच्या मरीन लाइन्स स्थानकाचं नाव बदलून मुंबादेवी स्थानक, तर चर्नी रोड स्थानकाचं नाव गिरगाव स्थानक करण्याची शिफारस या प्रस्तावात केली आहे.

तसंच हार्बर रेल्वे मार्गावरच्या कॉटन ग्रीन स्थानकाचं नाव काळा चौकी स्थानक, डॉकयार्ड स्थानकाचं नाव माझगाव स्थानक, तर किंग्ज सर्कल स्थानकाचं नाव बदलून तीर्थंकर पार्श्वनाथ रेल्वे स्थानक करण्याची शिफारसही या प्रस्तावात आहे. मंत्री दादाजी भुसे यांनी हा प्रस्ताव मांडला आणि सभागृहानं आवाजी मतदानानं या प्रस्तावाला मंजुरी दिली.

**<><><><><><>**

राज्यात नवीन महसूल कार्यालय निर्मिती आणि महसूल विभागातल्या अन्य विषयांबाबत शिफारशी करण्यासाठी सेवानिवृत्त सनदी अधिकारी उमाकांत दांगट यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असून या समितीचा अहवाल येत्या २५ तारखेला प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल अशी माहिती महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आज विधानपरिषदेत दिली. त्याचप्रमाणे पुनर्रचना करून नवीन तालुका निर्मितीचे निकष ठरवण्यासाठी कोकण विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आल्याचंही महसूल मंत्र्यांनी सांगितलं.

शिवसेनेचे आमश्या पाडवी यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेवर ते बोलत होते.

पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विभाग पुनर्रचनेच्या निर्णयाला स्थगिती देण्यात आली असल्याची माहिती विखे पाटील यांनी त्यासंदर्भातल्या प्रश्नाच्या उत्तरात दिली.

**<><><><><>**

विधानपरिषदेच्या दोन नवनिर्वाचित आमदारांचा शपथविधी आज झाला. मुंबई पदवीधर मतदारसंघाचे आमदार अनिल परब आणि नाशिक शिक्षक मतदारसंघाचे आमदार किशोर दराडे यांना उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आमदारकीची शपथ दिली.

**<><><><><>**

राज्यात बनावट पॅथॉलोजी लॅब वर नियंत्रण ठेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यासाठी स्वतंत्र कायदा आणला जाईल त्यात दर नियंत्रण, कलेक्शन सेंटर नोंदणी याचीही तरतूद करण्यात येईल अशी माहिती प्रभारी मंत्री उदय सामंत यांनी विधानसभेत दिली. नवीन कायदा होईपर्यंत सध्याच्या नर्सिंग कायद्यात सुधारणा करून कारवाई केली जाईल असं सामंत म्हणाले.
याबाबतचा प्रश्न सुनील राणे यांनी उपस्थित केला होता, त्यावर अजय चौधरी, आशिष शेलार, योगेश सागर, राजेश टोपे, प्रकाश आबिटकर आदींनी उप प्रश्न विचारले.

राज्यात हजारो कोटींचा अँब्युलन्स घोटाळा झाल्याचा आरोप करत, यासाठी दिलेली १० हजार कोटींची निविदा रद्द करून विशेष तपास पथकामार्फत चौकशी करण्याची मागणी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली. अर्थसंकल्पावरील चर्चेदरम्यान ते बोलत होते.

**<><><><><>**

राज्यात कारखान्यांमध्ये होणाऱ्या स्फोटाच्या आणि आगीच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर, औद्योगिक सुरक्षा विभागानं केलेल्या कार्यवाहीचा लेखाजोखा कामगार

विभागानं हिवाळी अधिवेशनात मांडावा असे निर्देश उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी आज विधानपरिषदेत दिले. नागपूरमधील धामणी इथल्या चामुंडी एक्सप्लोसिव्ह या फटाक्यांच्या वाती बनवण्याच्या कारखान्यात आग लागून ९ कामगारांचा मृत्यू झाल्याचा मुद्दा राष्ट्रवादी काँग्रेसचे अमोल मिटकरी यांनी आज लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून उपस्थित केला होता.

**<><><><><>**

आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जनतेकडून देणगी स्वीकारण्याची राष्ट्रवादी काँग्रेस–शरदचंद्र पवार पक्षानं केलेली मागणी केंद्रीय निवडणूक आयोगानं मान्य केली आहे. पक्षाच्या कार्याध्यक्ष खासदार सुप्रिया सुळे यांनी काल नवी दिल्लीत प्रसारमाध्यमांशी बोलताना ही माहिती दिली. सुळे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळानं काल निवडणूक आयोगाची भेट घेतली. त्यानंतर त्या बोलत होत्या.

**<><><><><>**

राज्याचं नाव उज्ज्वल करणाऱ्या अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना शासकीय सेवेत थेट नियुक्ती देण्यासंदर्भात सुधारीत धोरणाचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. त्यात अशा खेळाडूंना प्रामुख्यानं क्रीडा विभागात नियुक्ती देण्याच्या दृष्टीनं त्यांच्या क्रीडा अर्हतेमधे बदल केले आहेत. त्यानुसार ऑलिंपिक क्रीडा स्पर्धेत समाविष्ट असलेले सर्व खेळ थेट नियुक्तीसाठी पात्र राहतील. संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमातली शैक्षणिक पात्रता, वयोमर्यादा आणि इतर तरतुदींची पूर्तता करणारे खेळाडू थेट नियुक्तीसाठी पात्र ठरतील. या नियुक्तींसाठी शालेय आणि क्रीडा विभागाच्या अधिपत्याखाली एकूण ५५१ पदं निर्माण केली जाणार आहेत.

**<><><><><>**

राजधानी मुंबई आणि उपनगर क्षेत्रात पावसाने आज विश्रांती घेतली आहे.

**रायगड आणि रत्नागिरी** जिल्ह्यात गेले ३ दिवस कोसळणाऱ्या पावसाचा जोर काल रात्रीपासून कमी झाला.

**अकोल्यात** आज पहाटे विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस पडला.

**जालना** शहरासह जिल्ह्याच्या बहुतांश भागात काल रात्री हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडला.

**बीड** जिल्ह्यात काल झालेल्या पावसामुळे आष्टी तालुक्यात कडी नदीवर बांधलेला तात्पुरता पूल नदीच्या पाण्यात वाहून गेला. त्यामुळे अहमदनगर - बीड मार्गावरची वाहतूक विस्कळीत झाली आहे.

**कोल्हापूर** जिल्ह्यात झालेल्या पावसामुळे राधानगरी धरणात ३ पूर्णांक ९७ शतांश टीएमसी पाणीसाठा असून धरणातून तेराशे घनफूट प्रति सेकंद पाण्याचा विसर्ग सुरु आहे. जिल्ह्यात पंचगंगा नदीवरचे ५१ बंधारे पाण्याखाली गेले आहेत. **सांगली** जिल्ह्यातही काल सर्वत्र पाऊस पडला. जिल्ह्यात सर्वात जास्त पाऊस शिराळा तालुक्यात झाला. जिल्ह्यातल्या वारणा धरणात सध्या १६ पूर्णांक ६६ शतांश टीएमसी पाणीसाठा असल्याचं जलसंपदा विभागानं कळवलं आहे.

**//<><><><><><>//**